| | |
|---|---|
| MHKO030083862026 | **<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ७३७/२०२६ मधील नि.क्र. १ खालील आदेश</u>**<br>संतोष बिरु यमकर<br>वि.<br>महाराष्ट्र सरकार तर्फे शाहुपूरी पोलीस ठाणे |

प्रस्तुत अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदारचे कथन की, शाहुपूरी पोलीस ठाणे येथे फिर्याद देवून गुन्हा क्र.२५१/२०२६ भारतीय न्याय संहिताचे कलम ३०५(अ) प्रमाणे नोंदविण्यात आला. त्यातील मुद्देमालाचे वर्णन खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | रुपये |
|---|---|---|
| १. | सोन्याचे गंठण एक, २० ग्रॅम वजनाचे, सोन्याची पट्टी, काळे मणी व सोन्याचे पेंडट असलेले | १,६०,०००/- |
| २ | विविध दराच्या भारतीय चलनी नोटा | ३०,०००/- |
| | एकुण किंमत | १,९०,०००/- |

**३.** सदरचा मुद्देमाल अर्जदारचे मालकीचा असून तो त्याच्या दैनंदीन वापरातील आहे. तसेच, जप्त मुद्देमाल अर्जदार यांच्या दैनंदिन वापरातील असल्याने त्याची अर्जदारने मागणी केली. सदर मुद्देमाल पोलीस ठाण्यात तसाच पडून आहे. तरी सदर मुद्देमाल अर्जदारच्या ताब्यात द्यावा व न्यायालय ज्या काही अटी व शर्ती घालतील त्याचे पालन करतील असे अर्जात नमूद केले आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**४.** तपासी अंमलदारने(नि.४) वर म्हणणे देवून जप्त मुद्देमाल अर्जदारला अटी व शर्तीवर परत देणेत यावा अशी विनंती केली. तसेच, अर्जदाराने अर्जात नमूद केलेल्या मुद्देमालाचे वजन व तपासी अंमलदाराने नि.४ वर दिलेल्या म्हणणेतील मुद्देमालाचे वजन हे सारखेच आहे.

५. अभियोगपक्षाने नि.क्र.५ वर म्हणणे देवून असे कथन केले की, जप्त मुद्देमाल हा पुराव्यातील महत्वाचा भाग आहे. अर्जदार पावत्या नसल्याबाबत शपथपत्र सादर करीत असून भविष्यात सदर मुद्देमालाबाबत कोणती गुंतागुंत निर्माण झाल्यास अथवा इतर कोणाची मागणी आल्यास अर्जदार कडून मुद्देमाल याकामी जमा न करण्याची तसेच विक्री करण्याची शक्यता आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

६. प्रस्तुत प्रकरणात सदर दागिने परत करणेसाठी तपासी अंमलदार यांनी काही आक्षेप घेतलेला नसून प्रस्तुत कामातील अर्जदार हे गुन्हा क्र.२५१/२०२६ मध्ये फिर्यादी आहेत. तसेच अर्जदाराने जप्त मुद्देमाल दागिने हे त्याच्याच मालकीचे असलेचे ओळखले आहे.

७. कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार यांचा जप्त मुद्देमाल हा त्यांच्या दैनंदिन वापरातील असून त्यांनी त्याची खरेदी ब–याच वर्षापुर्वी केलेली असल्यामुळे त्याच्या मालकीसंबंधीच्या पावत्या/ बिल त्यांच्याकडून गहाळ झालेचे कथन शपथेवर केले आहे, तसे शपथपत्र दाखल केले आहे. या व्यतिरिक्त अर्जदाराने आधार कार्डची प्रत, एफ.आय.आर.ची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. सोन्याची शुध्दता तपासल्यासंदर्भातील अहवाल दिनांक २३.०७.२०२६ रोजीचा असून तो दाखल केलेला आहे. त्यावरुन जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांच्या मालकीचा असल्याचे दिसून येते.

८. एकंदरीतच सदर प्रकरण सुरु होणेसाठी खूप वेळ लागेल. तसेच पोलीस स्टेशनला किंमतीचे मुद्देमाल ठेवणे योग्य होणार नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाने ***सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजरात सरकार, ए.आय.आर. २००३ एस.सी. ६३८*** या न्यायनिवाड्याच्या आधारे व वरील कारणास्तव मुद्देमाल अर्जदार यांना तूर्त ताब्यात देण्यास कोणतीही हरकत दिसून येत नाही. सबब, जप्त मुद्देमाल काही अटी व शर्तीवर अर्जदारच्या अंतरिम कब्जात देणे योग्य व संयुक्तिक होणार आहे. म्हणून याकामी पुढीलप्रमाणे आदेश पारित करते.

**<u>आदेश</u>**

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) गु.र.नं.२५१/२०२६ चे तपासी अंमलदार, शाहुपूरी पोलीस स्टेशन यांनी जप्त केलेला मुद्देमाल –

| अ.क्र. | तपशिल | आजच्या बाजार भावाने रुपये |
|---|---|---|
| १. | सोन्याचे गंठण एक, २० ग्रॅम वजनाचे, सोन्याची पट्टी, काळे मणी व सोन्याचे पेंडट असलेले | २,३३,५४७/- |
| २ | विविध दराच्या भारतीय चलनी नोटा | ३०,०००/- |
| | एकुण किंमत | २,६३,५४७/- |

असा एकूण रक्कम रु.२,६३,५४७/– चा मुद्देमाल अर्जदार यांना अंतरिम कब्जात रक्कम रु.२,६४,०००/– (रुपये सात लाख सत्यानऊ हजार फक्त) च्या सुपुर्तनाम्यावर खालील अटींवर द्यावा–

अ) अर्जदार यांनी सदर जप्त मुद्देमाल हे कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करु नये किंवा नष्ट करु नये किंवा त्याचे स्वरुप बदलू नये.

ब) अर्जदार यांनी सुपूर्तनामा तपासी अंमलदार यांच्याकडे समक्ष द्यावा.

क) या न्यायालयाने किंवा अन्य न्यायालयाने आदेश केल्यास जप्त मुद्देमाल न्यायालयात हजर करावा.

ड) तपासी अंमलदारने जप्त मुद्देमाल अर्जदारचे ताब्यात देताना त्याची सर्व बाजूंनी छायाचित्रे घ्यावीत, रु.३०,०००/– च्या चलनी नोटा यांचे सविस्तर वर्णन करुन नोटांचे नंबर स्वतंत्रपणे नमूद करावेत आणि तसा पंचनामा करण्यात यावा. छायाचित्रे व सुपूर्तनामा दोषारोपपत्रासोबत दाखल करावा.

ई) सदर आदेशाची एक प्रत संबंधित तपासी अंमलदार यांना देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KASHYAP MANGAL DEEPAK
Date: 2026.08.03 12:07:17 +0530

कोल्हापूर. (**एम. डी. कश्यप**)

दिनांक: ०३.०८.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.